महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतन बँड रु.१५६००-३९१०० + ग्रेड पे रु.५४००) या संवर्गातील अनधिकृत गैरहजर असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना हजर करुन घेणे व त्यांना पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः मवैअ-२०१६/प्र.क्र.४८८/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, १० मजला
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
तारीख: ०७ मार्च, २०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतन बँड रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु.५४००) या संवर्गातील काही वैद्यकीय अधिकारी हे विविध कारणास्तव प्रदीर्घ काळापासून अनधिकृतरित्या गैरहजर होते. तसेच काही वैद्यकीय अधिकारी शासनाची पूर्व परवानगी न घेता पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी गैरहजर होते. सार्वजनिक आरोग्य सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने तसेच विभागांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने सदर अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांना हजर करुन घेण्याबाबत त्यांनी केलेल्या विनंतीनुसार तसेच संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांनी संबंधितांना विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून हजर करुन घेण्याबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषुंगाने संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना अनधिकृत गैरहजेरी नंतर शासन सेवेत पुनश्च रुजू करुन घेऊन त्यांना पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतन बँड रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु.५४००) या संवर्गातील काही वैद्यकीय अधिकारी हे विविध कारणास्तव प्रदीर्घ काळापासून अनधिकृतरित्या गैरहजर होते. तथापि, त्यांनी हजर करुन घेण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार तसेच संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांनी संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून हजर करुन घेण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना या परिच्छेदातील तक्त्याखाली नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून रूजू करुन घेण्यात येत असून त्यांना वैद्यकीय अधिकारी गट अ या पदावर रुजू होण्यासाठी तशी पदस्थापना खालील तक्त्यात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्याप्रमाणे देण्यात येत आहे.

अ. क्र.	**वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नांव**	**अनधिकृत गैरहजेरीनंतरची पदस्थापना**
१	डॉ. श्यामला राजाराम माळी	जिल्हा रुग्णालय, औंध, जि.पुणे

<u>अटी व शर्ती :-</u>

(१) संबंधित वैद्यकीय अधिकारी, गट-अ हे अनधिकृत गैरहजर असल्याने त्यांचा अनधिकृत गैरहजेरीच्या दिनांकापासून ते प्रत्यक्षात रुजू होण्यापर्यंतचा कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ४७ (१) नुसार सेवेतील खंड समजण्यात येवून सदर अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुजू करुन घेण्यात यावे. तसेच त्यांचा गैरहजेरीचा संपूर्ण कालावधी सेवेतील खंड म्हणून समजण्यात यावा व त्याप्रमाणे त्यांच्या रुजू आदेशात तसे स्पष्टपणे नमूद करावे.

(२) संबंधित वैद्यकीय अधिका-यांना रुजू करुन घेण्यापूर्वी त्यांची वैद्यकीय मंडळाकडून वैद्यकीय तपासणी करुन ते सेवा करण्यास शारीरिक / मानसिकदृष्ट्या सक्षम असल्याबाबत वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र घ्यावे.

(३) संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांचा चारित्र्य व वर्तणूक अहवाल (पोलीस तपास अहवाल) घ्यावा. (फौजदारी स्वरुपाचा / तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्रलंबित नसल्याचा पोलीस अहवाल घ्यावा.)

(४) अ .क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार अनधिकृत गैरहजेरीपूर्वीची कोणतीही नियमित / अस्थायी सेवा अनधिकृत गैरहजेरीनंतर रुजू करुन घेतल्यानंतरच्या सेवेत जोडून दिली जाणार नाही किंबहुना सेवा सलग करुन मिळणार नाही. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ४७ (१) नुसार सेवेतील खंड असल्याने संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांचा अनधिकृत गैरहजेरीचा कालावधी हा भविष्यात या विषयाच्या अनुषंगाने न्यायालयात दाद मागणार नाही.

(५) अनधिकृत गैरहजरीच्या दिनांकापासून प्रत्यक्ष रुजू होईपर्यंतच्या कालावधीचे वेतन व इतर कोणतेही अनुषंगिक सेवाविषयक लाभ अनुज्ञेय होणार नाहीत, सदर अनधिकृत गैरहजर कालावधीतील कोणतीही रजा मंजूर केली जाणार नाही, सदर कालावधी हा कोणत्याही प्रयोजनार्थ नियमित केला जाणार नाही वा त्यासंबंधी कोणतेही निवेदन विचारात घेतले जाणार नाही. तसेच वर नमूद आशयाचे संमतीपत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर संबंधित वैद्यकीय अधिका-यांकडून संबंधित उपसंचालक, आरोग्य सेवा यांनी घ्यावे.

(६) अनधिकृत गैरहजेरीच्या कालावधीत संबंधीत वैद्यकीय अधिकारी कोणताही खाजगी व्यवसाय/नोकरी किंवा परदेश दौरा केला नसल्याबाबत शपथपत्र शासन माहितीसाठी संबंधित उपसंचालक, आरोग्य सेवा यांच्यामार्फत शासनास सादर करावे.

(७) अनधिकृत गैरहजरीनंतर संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुजू करुन घेण्यात आले तरी गैरहजेरीचा कालावधी तसेच त्यापूर्वीची सेवा विचारात घेतली जाणार नसल्याने

संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना २००५ पूर्वीची जुनी निवृत्तीवेतन योजना लागु राहणार नाही.

(८) रुजू करुन घेण्यात येणाऱ्या संबंधीत सर्व अनधिकृत गैरहजर वेद्यकीय अधिकाऱ्यांना दि.३१/१०/२००५ च्या शासन निर्णयानुसार सुरु केलेली अंशदायी निवृत्तीवेतन योजना जी सद्यस्थितीत NPS योजनेत समाविष्ट झालेली आहे, ती लागु राहील.

(९) संबंधित सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना महाराष्ट नागरी सेवा (निवृत्तीवेतन) १९८२ नुसार मिळणारे कोणतेही लाभ अनुज्ञेय होणार नाही.

(१०) तसेच, भविष्य निर्वाह निधी इ. लाभ देखील मिळणार नाहीत.

२. या आदेशान्वये पदस्थापना देण्यात आलेल्या अनधिकृत गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पदस्थापनेचे सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे. अन्यथा, सदर पदस्थापनेचे आदेश १५ दिवसानंतर आपोआपच रद्द होतील. कार्यालय प्रमुखाने १५ दिवसानंतर रुजू होणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यास रुजू करुन घेऊ नये.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०७१३२२५१३५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2018.03.07 17:28:31 +05'30'

(व. मुं. भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
३) सहसंचालक (अ. व प्र.) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४) उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ, अकोला व कोल्हापूर,
५) जिल्हा शल्यचिकित्सक, वाशिम व सिंधुदुर्ग.
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपुर
७) जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम व सिंधुदुर्ग

८) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम व सिंधुदुर्ग.
९) मा. मंत्री (सा.आ.) यांचे .खाजगी सचिव,मंत्रालय मुंबई
१०) सर्व संबंधित वैद्यकीय अधिकारी गट-अ (संबंधित उपसंचालक, आरोग्य सेवा यांचे मार्फत)
११) निवड नस्ती सेवा-३